## प्रसिध्दी पत्रक

**आरोपी लोकसेवक सतीश लक्ष्मणराव मुळे, वय ४९ वर्षे, वरिष्ठ लिपीक, मृद व जलसंधारण विभाग (वाल्मी), मुख्यालय औरंगाबाद यांनी २५,०००/- रु लाच स्विकारल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | सतीश लक्ष्मणराव मुळे, वय ४९ वर्षे, वरिष्ठ लिपीक, मृद व जलसंधारण विभाग (वाल्मी), मुख्यालय औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री. सुजय घाटगे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | २५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचा बदलीचा अर्ज वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे पुटअप करून काम पुर्ण करून देण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | मृद व जलसंधारण विभाग (वाल्मी) आलोसे यांचे कार्यालय औरंगाबाद |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचा बदलीचा अर्ज वरिष्ठ अधिकारी यांचेकडे पुटअप करून काम पुर्ण करून देण्यासाठी सतीश मुळे, वरिष्ठ लिपीक, मृद व जलसंधारण विभाग (वाल्मी) मुख्यालय औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडे २५,०००/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सतीश मुळे, वरिष्ठ लिपीक, मृद व जलसंधारण विभाग (वाल्मी) मुख्यालय औरंगाबाद यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे २५,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दिनांक २५/०२/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, सतीश लक्ष्मणराव मुळे, वरिष्ठ लिपीक, मृद व जलसंधारण विभाग (वाल्मी) मुख्यालय औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन २५,०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद चे पोलीस अधिक्षक मा. श्री. अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. सुजय घाटगे यांनी केली आहे. त्यांना पोना भिमराज जिवडे, संतोष जोशी, पोशि कपील गाडेकर यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

25/02/2020

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**औरंगाबाद.**